# महाराष्ट्र शासन

## मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नाशिक यांचे कार्यालय.

जुना आग्रा रोड, अरण्य संकुल, आदिवासी विकास भवन समोर, नाशिक ४२२ ००२.
दूरध्वनी क्र.०२५३-२५९८५४५. ई-मेल- ccfnashik२०१२@gmail.com


जा.क्र. :कक्ष-2/जमिन/प्र.क्र.25/2022-23/ 1141 /सन 2023-24 दिनांक :- 01/01/2024

**पत्र**

**प्रति,**

**मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य, नागपुर**

**विषय :-** Diversion of 6.3912 Ha. forest land under section 2 of the Forest (Conservation) Act, 1980 for Rehabilitation and Up-gradation of newly declared NH-752G Section from Satana to Mandrul (From Km. 64+000 to Km 101+140) to two lane with paved shoulders in the State of Maharashtra on Engineering procurement & Construction (EPC) mode

**संदर्भ :-**
1) या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-2/जमीनप/प्र.क्र.25/910, दिनांक 3/11/2023
2) आपले कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-17/एफ.सी.ए-S1/पि.आय.डी-152830/नाशिक/2391, दिनांक 09/11/2023
3) उप वनसंरक्षक पुर्व भाग नाशिक यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-3/जमीन/1080/2022-23, दिनांक 21/12/2023

विषयांकित प्रस्तावाबाबत आपले कार्यालयाचे उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक 2 अन्वये 1 ते 5 त्रुटींची पुर्तता करुन, आवश्यक माहितीसह प्रस्ताव 3 प्रतीमध्ये सादर करणेत यावा असे कळविण्यात आलेले आहे त्याअनुसार उप वनसंरक्षक पुर्व भाग नाशिक यांनी संबंधित प्रकल्प यंत्रणेकडुन 1 ते 5 त्रुटींची पुर्तता करुन घेऊन संदर्भिय पत्र क्रमांक 3 अन्वये या कार्यालयास अहवाल सादर केलेला आहे. त्याअनुषंगाने संदर्भिय पत्र क्रमांक 2 मध्ये नमुद केलेल्या 1 ते 5 त्रुटीबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र | त्रुटी | पुर्तता |
|---|---|---|
| 1 | वळतीकरण करावयाचे रस्त्याकरिता प्राप्त KML File CD मध्ये क्षेत्र विवरण तपशिलानुसार Properties नमुद केलेल्या नाहीत व त्यानुसार Google map सादर करण्यात आलेला नाही. | प्रस्तावीत क्षेत्राची KML फाईल (हार्ड कॉपी) सी.डी. पुनश्च प्रस्तावासोबत जोडून सादर करण्यात येत आहे. त्यानुसार Google map प्रस्तावातील पृष्ठ क्र. 133 ते 139 वर जोडलेला आहे. |
| 2 | पृष्ठ क्र.57 मध्ये उपवनसंरक्षक पुर्व भाग नाशिक यांनी 975 वृक्षांची तोड होणार असल्याचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. परंतु मुख्य वनसंरक्षक नाशिक (प्रा) यांनी त्यांचे संदर्भिय पत्रात एकुण 1032 वृक्षांची तोड होणार असल्याचे नमुद केलेले आहे. त्यामुळे बाधीत होणा-या वृक्षांची अचुक आकडेवारी सादर करण्यात यावी. | सदरचे प्रस्तावासाठी 1032 वृक्ष बाधित होणार आहे. त्याबाबत वृक्षांची यादी प्रस्तावातील पृष्ठ क्र.141 ते 180 वर जोडलेली असुन तसे प्रमाणपत्र पृष्ठ क्र. 56 वर जोडलेले आहे. |
| 3 | प्रस्तावीत क्षेत्राचे वन्यजीव संरक्षित क्षेत्रापासुन अचूक अंतर दर्शविणारे उपवनसंरक्षक यांचे प्रमाणपत्र व त्याबाबतचा नकाशा सादर करण्यात आलेला नाही. | वन्यजीव संरक्षित क्षेत्रापासुन अचूक अंतर दर्शविणारा नकाशा प्रस्तावातील पृष्ठ क्र.140 वर जोडलेला असुन तसे प्रमाणपत्र पृष्ठ क्र. 54 वर जोडलेले आहे. |
| 4 | उपवनसंरक्षक पुर्व भाग नाशिक यांनी पर्यायी वनकरणाकरिता निवडण्यात आलेल्या वनजमिनीबाबत दिलेल्या योग्यता प्रमाणपत्रात 10.00 हे. वनजमिनीचा उल्लेख | भारत सरकार,पर्यावरण वन एवं जलवायु परिवर्तन मंत्रालय यांचेकडिल पत्र क्र. FC-11/117/2019-FC दिनांक 15 मार्च 2023 रोजीचे मार्गदर्शक सुचनेनुसार सदर प्रस्तावातील क्षेत्र 6.3912 हे. एवढे आहे. परंतू सन 1980 पुर्वी पासुन सदर |

| | | |
|---|---|---|
| | केलेला आहे. सदर प्रस्ताव 28 जुन 2022 पुर्वी नोदविण्यात आलेला असल्याने सदर प्रकरणी प्रस्तावीत क्षेत्राच्या दुप्पट वनक्षेत्राची पर्यायी वनिकरणाकरीता निवड करणे व त्यानुषंगाने आवश्यक असलेले दस्तऐवज, नकाशे व KML File सादर करण्यात यावे. | रस्ता हा सार्वजनीक बांधकाम विभागाच्या मालकीचा आहे. तदनंतर सदर रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे हस्तांतरीत केलेला आहे. सदर अस्तित्वातील रस्त्याचा डांबरीपृष्ठ 8.5 मी. रूंदीचा आहे. त्यानुसार सदर डांबरी रस्त्याचे क्षेत्रफळ 1.8343 हे. एकुण 6.3912 हे. वजा केले असता प्रस्तावित क्षेत्र 4.556 हे. एवढे आहे त्यानुसार 4.5556 हे. क्षेत्राच्या दुप्पट 9.112 हे. इतके येते त्यामुळे 9.112 म्हणजेच 10.00 हे. पर्यायी वनीकरण क्षेत्र घेण्यात आलेले आहे. त्याबाबतचे दस्तऐवज पृष्ठ क्र. 189 ते 191 वर जोडलेले आहे. |
| 5 | The Geo digital map in 1:10,000 or any suitable scale with geo-reference boundary in shape file prepared by using total stations or differential GPS and also indicate forest land, non-forest land & adjoining land to the proposed for diversion, in different colors must be duly signed by the Deputy Conservator of Forests concerned and Project Authority, as per the GOI letter No.F.no.I1-9I98-FCdt.SITJ20IL Compartment boundary on the map should clearly be marked. Satellite imageries to be used to show the density of forest cover to be enclosed. | प्रकल्प यंत्रणा व उपवनसंरक्षक यांनी स्वाक्षरी केलेला Geo Digital नकाशा प्रस्तावातील पृष्ठ क्र.129 ते 132 वर जोडलेला आहे. |

उपरोक्त प्रमाणे 1 ते 5 त्रुटयांची पुर्तता करून त्याबाबतचे दस्तऐवज मुळ प्रस्तावात समावीष्ट करून प्रस्ताव 3 प्रतीत पुढील कार्यवाहीसाठी यासोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सोबत :- वरीलप्रमाणे

(ऋषिकेश रंजन)
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)**
**नाशिक**

**प्रतिलिपी** :- उप वनसंरक्षक पुर्व भाग नाशिक यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीसाठी अग्रेषित

**प्रतिलिपी** :- कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नाशिक यांना माहितीसाठी अग्रेषित